नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 25/03/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील मेंढा फाटा येथे दिनांक 24/03/2021 चे 15:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सचीन गजानन राखडे, वय 30 वर्ष, रा. भिवापुर हा त्याच्या पत्नीचा मामे भाउ नामे– लोकेश याला डबल सीट बसुन त्याच्या एमएच–34/बीटी–1387 कमांकाच्या मोटरसायकलने मोहाडी ता नागभीड येथे जात होता. त्यादरम्यान वाशी तातोली मेंढा मार्गे अज्ञात पांढऱ्या रंगाचे बोलेरो पिकअपचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरघाव वेगाने व निष्काळजीपणे येवुन फिर्यादीच्या मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे मागे बसललेला लोकेश प्रकाश कोलते, वय 23 वर्ष, रा. मोहाडी हा गंभीर जखमी होउन उपचार दरम्याण ग्रामीण रुग्णालय भिवापुर येथे त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 134(अ)(ब),184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चनगोले मो.क. 7972441846 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर मौजा खापा येथे दिनांक 24/03/2021 चे 10.30 वा. ते 11.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विनायक कवडुजी तिळलेकर वय 42 वर्ष रा. सावनेर पंचसिन नगर रेल्वे कॉसिंग जवळ हे आपले सासरे यांचे घरी खापा येथे आपली एमएच–40/एएम–4093 कमांकाचा मोटरसायकल ने आले असता व सासरे यांचे घरासमोर मोटरसायकल उभी करून सासरे कडे गेले होते. ज्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 30,000/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोधे घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. विजय बारई पो.स्टे. खापा मो.न. 9822289572 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर अशोका ढाबा गिरड रोड उमरेड येथे दिनांक 23/03/2021 चे 18.00 वा. ते 20.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुजनसिंग चंद्रकुमार गौतम वय 35 वर्ष रा. परसोडी उमरेड हे आपली एमएच–40/एजे–0460 कमांकाची मोटरसायकलने जेवण करण्याकरिता अशोका ढाबा गिरड रोड एम.आय. डी.सी. येथे गेले असता मोटरसायकल ढाब्या समोर उभी करुन जेवन करण्याकरिता गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 30,000/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोधे घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. सफौ ईश्वर जोधे मो.नं. 9823115373 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर